Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 15 July 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ जूलै २०२५ सकाळी ११.०० वाजता**

****

भारतानं ऊर्जानिर्मितीच्या क्षेत्रात नवीन टप्पा पूर्ण केला आहे. जीवाश्मेतर इंधनातून वीजनिर्मितीचं ५० टक्के उद्दीष्ट निर्धारित मुदतीच्या पाच वर्ष आधीच पूर्ण झालं आहे. भारताची एकूण वीजनिर्मिती क्षमता ४८४ गिगावॅट असून, त्यापैकी २४२ गिगावॅट वीजनिर्मिती सध्या जीवाश्मेतर इंधनाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊजेच्याबाबत भारतानं दाखवलेली कटिबद्धता वास्तावात येत असल्याचं स्पष्ट झालं आहे. नवीन आणि नवीकरण ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी याबाबत समाजमाध्यमावर संदेश प्रसारित करुन भारतासाठी ही घटना ऐतिहासिक असल्याचं म्हटलं आहे. २०३० या वर्षापर्यंत जीवाश्मेतर इंधनांच्या मार्फत वीजनिर्मितीचं ५० टक्के उद्दीष्ट ठेवण्यात आलं होतं. मात्र २०२५ मध्येच ते पूर्ण होण्याची घटना प्रत्येक भारतीयासाठी अभिमानास्पद आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

****

राज्यात लवकरच धर्मांतरविरोधी कायदा आणला जाईल, असं गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी काल विधानपरिषदेत सांगितलं. दौंड तालुक्यात केडगाव इथल्या पंडिता रमाबाई मुक्ती मिशन संस्थेत शिकणाऱ्या मुलींवर ख्रिश्चन धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती, त्यांच्याशी चुकीची वर्तणूक इत्यादी आरोपांच्या अनुषंगानं लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक पदावरच्या महिला अधिकाऱ्याची समिती नेमली असून, तिचा अहवाल एका महिन्यात मिळेल, त्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. या वर्षी मार्च महिन्यात हैदराबादहून जेएनपीटीच्या दिशेनं निघालेल्या दोन कंटेनर्समध्ये सुमारे ५७ हजार किलो गोमांस सापडल्याप्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना करून चौकशी करण्याची घोषणाही भोयर यांनी केली.

राज्यात मागील दोन वर्षांत कुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय घट झाल्याचं महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सभागृहात एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.

****

बीडमधल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीतील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संबंधित आरोपींवर तत्काळ कारवाई कराव, तसंच सोसायटीच्या उर्वरित २३८ मालमत्ता तातडीनं जप्त करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल या संबंधातल्या बैठकीत दिले.

****

आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्षानिमित्त आयोजित विविध उपक्रमात पर्यावरण संवर्धन आणि वृक्षारोपणावर भर देण्याचे निर्देश, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. काल विधान भवनात यासंदर्भातल्या बैठकीत ते बोलत होते. सर्व उपक्रम विविध सहकारी संस्थांच्या सक्रिय सहभागातून आणि मदतीने राबवण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

****

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ चलनफुगवट्याचा दर गेल्या महिन्यात त्याआधीच्या महिन्याच्या तुलनेत ७२ शतांशांनी कमी झाला आहे. मे महिन्यात हा दर दोन पूर्णांक ८२ शतांश टक्के होता. तो जूनमध्ये दोन पूर्णांक एक दशांश टक्के पर्यंत खाली आला. जानेवारी २०१९ पासूनचा हा चलनफुगवटा दराचा नीचांक आहे. या महिन्यात भाज्या, अन्नधान्य, मांस, मासे, मसाले तसंच साखर आणि दुग्धजन्य पदार्थांचे भाव कमी राहिल्यानं ही घट दिसून येत असल्याचं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं सांगितलं.

****

शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. ऑगस्ट महिन्यात अंतिम सुनावणीला सुरुवात करू, असं सांगत न्यायालयानं काल सुनावणी पुढं ढकलली. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. यावेळी न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या. या प्रकरणाला दोन वर्षे झाली आहेत त्यामुळे आता नव्यानं अर्ज करणं बंद करावं, असं त्यांनी ठाकरे गटाला सांगितलं.

****

आत्मनिर्भर भारत उपक्रमाअंतर्गत राबवण्यात येत असलेल्या एक जिल्हा एक उत्पादन योजनेत रत्नागिरी जिल्ह्यानं सुवर्णपदक मिळवून देशात अव्वल स्थान प्राप्त केलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपममध्ये काल झालेल्या राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात रत्नागिरी जिल्ह्याला हापूस आंबा पिकासाठी एक जिल्हा एक उत्पादन राष्ट्रीय पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला. रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते हा सन्मान स्वीकारला. एक जिल्हा एक उत्पादन योजना देशाच्या प्रत्येक जिल्ह्यातून निवडलेल्या उत्पादनाच्या ब्रँडिंग आणि प्रोत्साहनासाठी राबवली जाते.

****

दुबई इथं झालेल्या ५७व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिंपियाड स्पर्धेत भारतीय संघातल्या चारही विद्यार्थ्यांनी दोन सुवर्ण आणि दोन रौप्य पदकं पटकावली. या संघात महाराष्ट्रातल्या जळगावचा देवेश पंकज भैया आणि तेलंगणाच्या संदीप कुची यांनी सुवर्णपदक, तर ओडिशाच्या देबदत्त प्रियदर्शी तसंच नवी दिल्लीच्या उज्ज्वल केसरी यांनी रौप्यपदक पटकावलं.

****